# आपला नांदेड जिल्हा

## १. भौगोलिक स्थान

नांदेड जिल्हा महाराष्ट्राच्या आग्नेय सीमेवर, तेलंगणाच्या वायव्य सीमेजवळ आणि कर्नाटकच्या उत्तरेस येतो. ह जिल्हा उत्तर अक्षांश १८° १६’ ते १९° ५५’ व पूर्व रेखांश ७६° ५६’ ते ७८° १९’ दरम्यान पसरलेला आहे. नांदेड जिल्हा हा महाराष्ट्र राज्याच्या पूर्व भागात तसेच मराठवाडा विभागाचा पूर्व भाग, जो छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) विभागाशी संबंधित आहे. नांदेडच्या उत्तरेला विदर्भातील यवतमाळ जिल्ह्याने, नैऋत्येला लातूर, पश्चिमेला परभणी, आणि हिंगोली या जिल्ह्यांनी वेढलेले आहे. तसेच तेलंगणातील निजामाबाद, कामारेड्डी, निर्मल, आदिलाबाद आणि कर्नाटकातील बिदर हे जिल्हे नांदेडला जोडून आहेत. नांदेड जिल्हा एकूण १६ तालुक्यांमध्ये विभागलेला आहे.

नांदेड जिल्ह्याचे क्षेत्रफळ १०,४२२ चौ.कि.मी आहे. जिल्ह्याची लोकसंख्या इ.स २००१ च्या जनगणनेनुसार २८,७६,२५९ इतकी आहे. नांदेड जिल्ह्यात सरासरी पर्जन्यमान ९५३.८ मी.मी आहे.

जिल्ह्यातील प्रमुख नद्या - गोदावरी, मांजरा, आसना, मन्याड व पैनगंगा.

नांदेड जिल्ह्याचे क्षेत्र असमान टेकड्या, पठार, हलके उतार आणि दऱ्यांचं आहे. गोदावरी नदी जिल्ह्यातून वाहते. भौगोलिकदृष्ट्या जिल्ह्याचे दोन भाग पडतात. उत्तर आणि ईशान्येकडचा डोंगराळ प्रदेश आणि गोदावरी, मांजरा, मन्याड, पेनगंगा नद्यांच्या काठावरचा सखल भाग.

## २. इतिहास

### २.१. प्राचीन:

इसवीसन पुर्व सहाव्या शतकाच्या सुमारास महाराष्ट्रातील विविध प्रदेश अश्मक, कुंतल, मलक, अपरांता, ऋषिक नावाने संबोधिले जाऊ लागले. नांदेड भोवतीच्या प्रदेशाचा समावेश त्याकाळी विदर्भात होत असे. या भागाची दक्षिण सीमा गोदावरी नदीपर्यंत होती. नांदेड हे नावच मुळी गोदावरीशी निगडीत आहे. नदीच्या काठावर वसलेले म्हणुन नांदीकट, नंदिकड आणि नांदीकट या संस्कृत शब्दापासुन नांदेडची व्युत्पती होते. गोदावरीच्या दोन्ही तीरावर वसलेले म्हणुन नंदीकट. नांदेडचा उत्तरेकडील नंदवंशाच्या कारकिर्दीशी संबंध असावा, “नवनंदडेरा“ यापासून नांदेड झाले असावे. नांदेडच्या उत्तरेला १५० किलोमीटर (९३ मैल) अंतरावर असलेल्या वाशिम इथं सापडलेल्या एका ताम्रपटावरून पुरातत्वशास्त्रज्ञांनी हे नांदेड शहर पूर्वी नंदिता म्हणून ओळखलं जात असे असं अनुमान काढलं आहे. याचं दुसरं नाव नंदीग्राम होतं. नांदेड हे नाव शिवाचं वाहन नंदीपासून विकसित झाल्याचं लोककथा सांगते. शिवानं गोदावरी नदीच्या काठावर तपश्चर्या केल्याचं सांगितलं जातं. हे

नंदी-तट नंतर नांदेड झालं. नांदेडचा उल्लेख महाभारतात भरत राजाच्या आजी-आजोबांचं स्थान असा आहे. इ.स.च्या पहिल्या शतकात, या भागातील सत्ता आंध्रभृत्य आणि सातवाहनांकडं होती. ख्रिस्तपूर्व ५ व्या आणि चौथ्या शतकात नांदेडवर नंद घराण्याचं राज्य होतं. तिसऱ्या शतकात (२२७ ते २३१ ईसापूर्व) हा अशोकाच्या अंतर्गत मौर्य साम्राज्याचा भाग होता. स्थानिक सिंचन पद्धतीची आणि स्वतः नांदेडची नोंद लीळाचरित्र (१२०० च्या दशकाच्या उत्तरार्धात) या ग्रंथात आहे. नांदेड हे तीन मराठी पंतकवी विष्णुपंत शेसा, रघुनाथ शेसा आणि वामन पंडित यांचं जन्मस्थान आहे.

राजकीयदृष्ट्या सुमारे ४०० पेक्षा अधिक वर्षापर्यंत नांदेडचा परिसर सातवाहनांच्या साम्राज्यात होता. सातवाहनानंतर इ.स. २५० चे सुमारास वाकाटकांनी राज्य केले. या घराण्यातील विन्ध्यशक्ती यांनी विदर्भात राज्य स्थापले होते. वाकाटक राजे व्दितीय रुद्रसेन यांच्या पट्टराणी प्रभावती गुप्त या गुप्त घराण्यातील सम्राट व्दितीय चंद्रगुप्त यांच्या कन्या होत्या. वाकाटक घराण्यातील प्रथम प्रवरसेन हे या घराण्यातील सर्वश्रेष्ठ राजे. प्रथम प्रवरसेन हे पराक्रमी, साहित्यिक आणि प्रजाहितदक्ष राजे होते. यांनी सुमारे ६० वर्षे राज्य केले. दख्खनच्या फार मोठया भागावर यांचे अधिपत्य होते. वाकाटकांनंतर दक्षिण भारताच्या कांही भागांवर राज्य करणारे घराणे “बदामीचे चालुक्य“ म्हणुन संबोधिले जाते. यांची राजधानी कर्नाटकाच्या विजापूर जिल्ह्यातील वातापी (बदामी) येथे होती म्हणुन याला “बदामीचे चालुक्य घराणे” असे म्हणतात. या घराण्याच्या लेखात नांदेडचा “नंधाल” असा उल्लेख आढळतो.

नांदेडचे परिसराचे भाग्य राष्ट्रकूटांचे काळात उजळले होते. बदामीच्या चालुक्यानंतर “लत्तलूरपुरवराधिश्वर” असे स्वत:ला म्हणवुन घेणाऱ्या राष्ट्रकूटांचे राज्य आले ते सुमा २०० वर्षे टिकले. राष्ट्रकूटांनी त्याच काळात कंधारला राजधानीचा मान मिळवुन दिला. राष्ट्रकूटांनंतर या भागावर राज्य केले ते कल्याणीच्या चालुक्य वंशीय राजांनी, महाराष्ट्राच्या अन्य कुठल्याही प्रदेशापेक्षा नांदेड आणि उस्मानाबाद या जिल्ह्याशी या घराण्याचा निकटचा संबंध होता. या काळात या परिसरात कितीतरी मंदिरे उभारली गेली त्यापैकी होट्टल, मुखेड, खानापूर, बाऱ्हाळी, सुगांव, एकलारे, येसगी, सगरोळी, संगम करडखेड, तडखेल इत्यादी ठिकाणच्या मंदिरांची माहिती मिळते. कंधारपुरला राजधानी स्थापणारे राष्ट्रकूट पूढे कल्याणी चालुक्यांचे मांडलिक म्हणुन अकराव्या शतकात राहत होते. महाराष्ट्रभर केवळ नव्हे तर त्या बाहेरच्या विस्तृत प्रदेशावर राज्य करणारे यादव घराणे, महाराष्ट्राच्या इतिहासाच्या उष:काली सातवाहनांचे साम्राज्य जेवढ्या महत्त्वाचे होते तेवढेच प्राचीन काळाच्या उत्तरार्धात या यादव घराण्याचे महत्त्व होते. संपूर्ण नांदेड परिसर त्यांच्या अधिपत्याखाली होता. पाचव्या भिल्लमाने देवगिरी हे नगर वसविले आणि तेथे आपली राजधानी हलविली. तेव्हां पासून मराठवाडा महत्त्वाचा ठरला. कृष्णेच्या उत्तरेकडील सारे राज्य यांच्या ताब्यात

होते. रट्ट घराण्याच्या बल्लाळाची अमर्दकपूर (औंढा जि.हिंगोली) येथे राजधानी होती आणि उपराजधानी होती अराध्यपूर (अर्धापूर जि.नांदेड).

## २.२. मध्ययुगीन इतिहास:

इसवी सन. १२९६ पर्यंत नांदेड परिसरावर देवगिरीच्या यादवांचा प्रभाव होता. यादवांच्या सत्तेचे एक प्रमुख ठाणे नांदेड नजिकच्या अर्धापूरात होते. हे अर्धापूर म्हणजे यादवकालीन आराध्यपूर. १४ व्या शतकाच्या प्रारंभी घडलेल्या या राजकीय स्थित्यंतराचे दूरगामी परिणाम महाराष्ट्राच्या आणि दख्खनच्या इतिहासावर झाले. अल्लाउद्दीन खिलजीच्या आक्रमणाने राजकीय संघर्षाचे एक नवे पर्व दख्खन पठारावर झाले.सन.१३१८ मध्ये यादवांचे राज्य अल्लाउद्दीन खिलजी याने कायमचे बुडवले आणि महाराष्ट्रात मुसलमान सत्तेचा अंमल सुरू झाला. नांदेड परिसर त्याला अपवाद नव्हता.

आजच्या नांदेड जिल्ह्याचा मध्ययुगीन इतिहास एकुण दख्खन पठारावरील राजकीय घडामोडीशी प्रत्यक्ष संबंध ठेवून होता. मराठवाडा, विदर्भ आणि खानदेश या भूप्रदेशात घडणाऱ्या संघर्षाचे पडसाद नांदेड घेण्याअगोदर दख्खन पठारावरील राजकीय स्थित्यंतरे समजुन घेणे अगत्याचे आहे. इसवी सनाच्या तेराव्या शतकापर्यंत मराठवाड्याचा परिसर म्हणजेच महाराष्ट्रातील गोदा खोरे, संपन्न अशा राजसत्ताचे माहेरघर होते. इसवीसन पूर्व ५ व्या शतकातील अश्मक आणि मूलक ही दोन्ही महाजनपदे या परिसरातील, त्यानंतर अनुक्रमे सातवाहन, वाकाटक, पुर्वचालुक्य, राष्ट्रकुल, उत्तरचालुक्य, यादव शिलाहार, कलचुरी या राजसत्तांच्या कालखंडात या परिसराने आर्थिक संपन्नता, राजकीय स्थैर्य, प्राचिन व्यापार उदीम उपभोगली. मोठ मोठी व्यापारी शहरे इथे उदयाला आली. अप्रतिम कालाविष्कार घडविले. दऱ्याखोऱ्यातून सह्याद्रीच्या कड्याकपारीतून अप्रतिम कला अविष्कार घडविले होते. या कला अविष्काराला उदार हस्ते मदत करणारे संपन्न व्यापारी इथे होते. राजघराण्याच्या कोषागारात अमित संपती होती. इथल्या संपन्नतेच्या कथा अरब व्यापाऱ्यांमार्फत सर्वदूर पसरल्या होत्या. १३ शतकात हे सारे बदलू लागले. पराकोटीचा सत्तासंघर्ष सुरु झाला. त्याची झळ नांदेड जिल्ह्यालाही बसली. या संघर्षाबरोबरच प्रशासन व्यवस्थेतही बदल घडले, नवी सुभेदारी व्यवस्था उदयास आली. इ.स. १३४६ साली दिल्लीच्या सलतनतीने दख्खन पठारावर चार सुभे निर्मीले. नांदेडचा समावेश या सनतनती सुभ्यामध्ये झाला. नांदेड जिल्ह्याचा समावेश वऱ्हाड आणि बिदर तरफेत झालेला होता. सफदरखान सिस्तानी हा वऱ्हाड तरफेचा तरफदार होता. सत्तासंघर्षाचे नांदेड परिसरातील आणखी एक केंद्र होते माहुर, येथिल डोंगरी किल्ला अनेक लढ्याचा साक्षीदार आहे. या किल्ल्याच्या परिसरात खरे तर गोंडाचे राज्य होते. गोंड हे दख्खनच्या पठारावरील वनक्षेत्राचे खरे राजे, तुघलक आणि बहमनी सत्तांच्या विस्ताराला गोंडांनी सतत विरोध केला. नांदेड जिल्ह्यातील खेरलाचा गोंड राजा नरसिंगदेव हा देखील अनेक वर्षे

बहमनीशी लढत राहिला.बहामनी सल्तनतीचा वजीर महंमद गवान याने बहमनी राज्याची प्रशासकीय पुर्रचना करण्याचे काम हाती घेतले. या महंमद गवानचे लष्करी ठाणे नांदेड शहराच्या परिसरातच होते. त्याची आठवण म्हणुन आजही नांदेडमध्ये वजिराबाद नावाची वस्ती आहे. या वजीर महंमद गवानने केलेल्या प्रशासकीय सुधारणेत बहमनी राज्याचे चार तरफ रद्द करण्यात येऊन आठ नवे सुभे निर्माण करण्यांत आले. या पुनर्रचनेनुसार आजचा नांदेड जिल्हा माहुर सुभ्याचा भाग बनला. नांदेड जिल्हा आकाराला यायला लागला तो येथपासून.

महंमद गवानच्या विरुध्द राजदरबारात मात्र बरेच राजकारण घडले इ.स. १४८१ साली या राजकीय कट कारस्थानचा परिणाम वजीर महंमद गवानच्या मृत्युत झाला. त्याला देहदंड देण्यापर्यंत सल्तनतीतले कटकारस्थान पोहोचले. पराकोटीचा सत्तासंघर्ष सगळीकडे चालु होता. १४८२ साली सुलतान महमंदशाह तिसरा बहमनी मृत्यु पावला व त्याचा १२ वर्षाचा मुलगा महमुदशाहा अल्पवयीन राजा म्हणून सत्तेवर आला. सल्तनतीतील सारी सत्ता कासीम बरीदने आपल्या हाती घेतली व पालनकर्ता राजा म्हणून तो कारभार पाहु लागला. नांदेड जिल्ह्यातील कंधारचा किल्ला हा कासीम बरीदचे प्रमुख लष्करी ठाणे बनला. इसवी सन १५२६ साली तिकडे दिल्लीमध्ये जहिरुद्दीन मुहंमद बाबरने मुघल सत्तेची स्थापना केली. ही मुघलसत्ताही दख्खनच्या सत्ता संघर्षात येऊन उतरली. अहमदनगरच्या निजामशाहीत समाविष्ट असलेला वऱ्हाड सुभा आणि त्यातला नांदेड जिल्हा इ.स. १५९६ मध्ये मुघलांच्या राज्यात समाविष्ट झाला. गेली तिनशे-साडेतिनशे वर्षे चाललेला स्थानिक मुस्लीम सल्तनतीचा संघर्ष संपला आणि नांदेड जिल्हा पुन्हा दिल्लीपतीच्या अधिपत्याखाली आला.

१७ व्या या शतकातील नांदेडच्या इतिहास म्हणजे अहमदनगरची निजामशाही आणि मुघल सत्ता यांच्यातल्या संघर्षाची गाथा होय. दोन अडीच दशके हा संघर्ष चालला. १६३२ साली दौलताबादही मुघलांच्या ताब्यात आले. निजामशाहीतील कंधार आणि दौलताबाद सारखी प्रमुख लष्करी ठाणी पडल्यामुळे मुघलांचा प्रभाव वाढला. नांदेड हे सुभ्याचे प्रमुख ठिकाण झाले. नांदेडच्या किल्यातून सुभ्याचा कारभार होऊ लागला. छत्रपती शिवरायांनी सामान्य रयतेचा विश्वास जागवला. त्याना लढण्याचे सामर्थ्य दिले. सत्तेचा उपभोग स्वत:च्या स्वार्थासाठी करण्यांच्या या मध्ययुगीन कालखंडात काळाची चौकठ भेदुन लोककल्याणाचा विचार करणारे मराठी स्वराज्य छत्रपती शिवाजी महाराजानी निर्मीले. मुघल-मराठा संघर्षातील लक्षणीय अशी लढाई नांदेड जिल्ह्यात झाली नसली तरी उभय पक्षाच्या पक्षाच्या फौजानी नांदेड परिसरात घोडदौड मारली. १६७० साली वऱ्हाडवरील चढाईच्या वेळी शिवाजी महाराज नांदेडला आले होते. इ.स. १६५८ साली औरंगजेब मुघल सम्राट बनला. इ.स. १६८६ साली मुघलांनी विजापूर जिंकले. विजापुरची आदिलशाही आणि गोवलकोंड्याची कुतूबशाही या दोन सल्तनतीच्या पाडवानंतर औरंगजेबाने मराठ्यावर सगळे लक्ष

केंद्रीत केले. कंधारचा आपला लष्करी तळही मजबुत केला हमिदुद्दीनखान या किल्लेदाराने याच काळात कंधारच्या किल्यावर आपला तळ ठोकला, मुघल-मराठा संघर्ष तीव्रतर बनत चालला. हा संघर्ष चालू असतांना नांदेड परिसरातील सामान्य रयतेचे जीवन अत्यंत हलाखीचे झाले होते. अनेक लोक स्थलांतरीत होऊ लागले. याच काळात नांदेड मधील काही घराणी काशी प्रयाग अशा तिर्थक्षेत्री स्थलांतरित झालेली दिसतात. १८ व्या शतकातील संघर्षही मुख्यत: मुघल आणि मराठा यांच्यातला सत्तासंघर्ष होता.

## २.३. श्री गुरुगोविंद सिंघाची नांदेड भेट:

इ.स. १७०४ च्या नंतर मुघल-मराठा संघर्ष अशा वळण येऊन पोहोचला की मुघलांचा पराजय स्पष्टपणे जाणवावा. मराठ्यानी दख्खन पठारावरील आपली सारी ठाणी परत मिळवली. आजचा नांदेड जिल्हा त्याकाळातल्या नांदेड आणि माहूर जिल्ह्यात विभागलेला होता. त्यातले माहुर हे वऱ्हाड सुभ्यात समाविष्ट होते तर नांदेडचा समावेश बिदर सुभ्यात झालेला होता. नांदेडची विभागणी ३० परगण्यात आणि ९४९ गावात झाली होती तर माहूर जिल्ह्यात २० तालुके - परगणे आणि ११४१ गावं होती. राजकीय सत्तासंघर्षाच्या या धामधुमीत नांदेड शहराला अनन्य साधारण महत्व प्राप्त करुन देणारी एक लक्षणीय घटना घडली. या घटनेचे महत्व स्थानिक नांदेड पुरते मर्यादित न राहता भारतीय इतिहासात नांदेडला एक आगळे स्थान प्राप्त करुन देणारी ही घटना आहे. एका नव्या युगाचा प्रारंभ झाल्याची साक्ष नांदेड परिसर देत होता. आज पासून तीनशे वर्षापूर्वीची श्री गुरुगोविंद सिंघाची नांदेड भेट ही घटना केवळ त्यांच्या अंतकाळापुरती मर्यादित राहत नाही तर गुरु ग्रंथसाहिबच्या रुपात झालेल्या तत्वचिंतनाची ती मुहुर्तमेढ ठरते. शिखधर्मासंबंधीचे कांही महत्वपुर्ण हुकूम नांदेड मुक्कामाहून निघाले आहेत. त्यामुळे नांदेडला एक आगळे महत्व आहे. गुरू गोविंद सिंग (१६६६-१७०८) हे १७०७ मध्ये ऑगस्टच्या अखेरीस मुघल सम्राट बहादूर शाह पहिला (१६४३-१७१२) याच्यासोबत नांदेडमध्ये आले. बहादूर शाह पुढं गोवलकोंडा इथं गेला, तेव्हा गुरू गोविंदसिंग नांदेडमध्येच राहिले. याच गावात गुरू गोविंदसिंग यांनी घोषित केलं की, यापुढं शिखांचा गुरू कुणी माणूस नसेल, तर ग्रंथ हाच शिखांचा गुरू असेल. मी शेवटचा (दहावा) जिवंत गुरू आहे. आणि यापुढं आपला पवित्र ग्रंथ, गुरू ग्रंथसाहिब हा शिखांचं नेतृत्व करील. गुरू गोविंद सिंग यांचं निधन याच गावात झालं. १८३५ मध्ये महाराजा रणजितसिंग यानं सिकंदर जाह (हैदराबादचा तिसरा निजाम) याच्या सहाय्यानं नांदेड इथं गुरुद्वाराचं बांधकाम सुरू केलं. गुरुद्वारा बांधण्याचा खर्च रणजितसिंग आणि निजाम यांनी मिळून केला. गुरुद्वारा गुरू गोविंदसिंग यांच्या अंत्यसंस्काराच्या जागेवर बांधला गेला. हा गुरुद्वारा आता हजूर साहिबचा भाग आहे.

१७२४ च्या आक्टोबर महिन्यात मुघल आणि निजामी सैन्यात साखरखंडी येथे मोठी लढाई झाली. दख्खनचे सहा मुघल सुभे निजामच्या ताब्यात आले. मुघल साम्राज्याचा सुभेदार म्हणुन निजामाने दख्खनचे सुभे ताब्यात घेतले असले तरी प्रत्यक्षात साखरखंडी येथील लढाईतील विजयामुळे मुघलाना पराभूत करुन चिन कुलीखान निजाम-उल् मुल्कने आपले स्वतंत्र राज्यच अस्तित्वात आणले होते. या स्वतंत्र राज्याचा कारभार औरंगाबादेतुन पाहिला जाऊ लागला. नांदेड जिल्हा आता मुघलाच्या वर्चस्वातुन बाहेर पडला आणि स्वतंत्र निजामी राज्याचा भाग बनला कालांतराने निजामी राज्याची राजधानी, हैद्राबादला स्थलांतरीत झाली.

इ.स. १७२४ मधला नांदेड जिल्हा म्हणजे नांदेड सरकार खुप विस्तृत होते. आजचा नांदेड जिल्हा, अदिलाबाद आणि निजामाबाद जिल्हा हा सारा परिसर मिळुन हे नांदेड सरकार बनले होते. या काळात इंग्रज आणि फ्रेंच व्यापारी आपल्या फौज दख्खनच्या राजकारणात उतरले होते.

## २.४. आधुनिक काळ:

महाराष्ट्राच्या संदर्भामध्ये सन १८१८ पासून आधुनिक काळाची सुरुवात मानावी लागते. या एतद्देशीय सत्तेचा अस्त होऊन पेशवाई संपुष्टात आली व ब्रिटीस राज्य स्थिरावले. इ.स. १८५३ साली इंग्रज आणि निजाम यांच्यात एक नवा करार झाला. या करारान्वये हैद्राबादच्या निजामाने आपल्या राज्यातला पन्नास लाख शेतसारा वसुल करता येण्याजोगा भूप्रदेश इंग्रजाच्या ताब्यात द्यायचे कबुल केले. त्याअन्वये सारा विदर्भ सरकार हा विभाग इंग्रजांचा भाग झाला आणि नांदेड परिसरातील हदगांव, माहुर, किनवट हा भाग मात्र हैद्राबाद राज्यातच राहिला. अशा प्रकारे हदगांव, माहूर, किनवट हे भाग विदर्भ सरकारातून नांदेड सरकारात दाखल झाले. नांदेड जिल्ह्याच्या दृष्टीने हा बदल लक्षणीय आहे. नबाब सालारजंगने गुत्तेदारी पध्दत आणि शेतसारा वसुलीच्या इतर पध्दती बंद करुन एक नवी शेतसारा पध्दत, जिल्हाबंदी पध्दत अंमलात आणली. रोव्हेन्यू सर्वे अँन्ड सेटलमेंट डिपार्टमेंट स्थापन करण्यांत आले. शेतसारा वसुलीसाठी शासकीय महसुल यंत्रणा निर्माण करण्यांत आली. १८८१ च्या दरम्यान आठ तालुक्यांचा नांदेड जिल्हा आकाराला आला आणि औरंगाबाद सुभ्याचा भाग बनला. १८८५ साली सुभेदार पद पुन्हा निर्माण झाले आणि ते १९४९ पर्यंत कायम होते. जिल्हा प्रशासनाचा प्रमुख म्हणुन तालुकापद निर्माण झाले ते १९४९ पर्यंत कायम होते. तालुका पातळीवर तहसिलदार पद होते. जिल्हा प्रशासनात नायब तालुकदार,पेशकार, शिरस्तेदार अशी कांही पदेही होती. हैद्राबाद शहरात १८५५ साली स्टेट बँक काढण्यांत आली. अधुनिक बँकींग व्यावस्था सुरु झाली. कालातंराने निजामी राज्यातल्या कांही गावांत स्टेट बँकेच्या शाखा निघाल्या. नांदेड जिल्ह्यातील उमरी या बाजारपेठत अशीच एक शाखा उघडली गेली. हैद्राबाद राज्याची राजभाषा फारसी होती, फारसी शिक्षण देणारे मदरसे कांही ठिकाणी होते. १८६८ साली नांदेडलाही

एक फारसी मदरसा निघाला. इ.स.१८८४ मध्ये फारसी ऐवजी उर्दुला राजभाषेचा मान मिळाला. शिक्षणाचे माध्यम उर्दु झाले. इग्रजांच्या प्रभावातुन दळणवळणाची साधने वाढली. हैद्राबाद ते वाडी पर्यंत रेल्वे सुरु झाली. इ.स. १९०० साली नांदेड या गावात रल्वे आली. हैद्राबाद-मनमाड असा मिटरगेज रेल्वे मार्ग पुर्ण झाला आणि या रेल्वेमार्गावरील एक रेल्वे स्टेशन नांदेड गावाजवळ उभारले गेले. १९४२ च्या चलेजाव आंदोलनाचेही असेच पडसाद राज्यात उमटले. स्वामी रामानंद तीर्थ यांनी या आंदोलनाच्या दृष्टीने संघटन कार्य सुरु केले. हैद्राबाद राजकारणाची पावले आझाद हैद्राबादच्या दिशेने पडु लागली होती. हैद्राबादच्या निजामाची भूमीकाही या वाटचालीला पुरक होती.

## २.५. मुक्तिसंग्राम पर्व:

१६ ऑगस्ट १९४६ रोजी स्टेट कॉग्रेसची बैठक हैद्राबादला संपन्न झाली. कॉग्रेस मधला जहाल गट प्रभावीपणे सक्रिय झाला. रझाकाराच्या आक्रमक पवित्र्यामुळे आता जीवनमरणाचा अंतिम संघर्ष पुढे दिसत होता. १९४६ च्या अखेरीस महाराष्ट्र परिषदेचे हैद्राबाद स्टेट कॉग्रेस मध्ये विलीनीकरण झाले. हैद्राबाद स्टेट कॉग्रेसाचे पहिले अधिवेशन मुझीराबाद येथे १६ ते १८ जुन या काळात संपन्न झाले. स्वामी रामानंद तीर्थ यांची स्टेट कॉग्रेससचे पहिले अध्यक्ष म्हणुन निवड झाली. त्यानी या अधिवेशनातच निजामाच्या आझाद हैद्राबाद विरुध्दच्या आणि प्रस्तावित स्वतंत्र भारतातल्या हैद्राबादच्या विलीनीकरणाच्या अंतिम लढ्याचे रणसिंघ फुंकले.

१५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र होणार या पार्शभुमीवर हैद्राबादच्या निजामाने राज्यातल्या रयतेवर अनेक निर्बध लादले. सभा बंदी, भाषण बंदी, हिंदी संघराज्याच्या म्हणजेच तिरंगा झेंड्यावर बंदी अशा अनेक प्रकारच्या बंदी लादणारे फर्मान काढले गेले. स्वतंत्र होऊ घातलेल्या भारताचा तिरंगा ध्वज हा हैद्राबाद राज्यात परकीय ध्वज ठरवला जाऊन  तो ध्वज फडकवणाऱ्यास राजद्रोही मानले गेले. अशा अवस्थेत स्वतंत्र भारतात विलीन होऊ इच्छिणारी राज्यातली ८५% जनता अधिकाधिक अस्वस्थ होत गेली. असंतोष भडकत गेला. विलिनीकरणाच्या मागणीने उग्र अशा आंदोलनाचे रुप धारण केले.इंग्रजांनी भारतसोडुन जायचे ठरवले त्याच्या ताब्यात असलेल्या भारताला स्वातंत्र्य मिळणार ही गोष्ट स्पष्ट झाली. त्याचबरोबर भारतातल्या ५६५ राजांनाही इंग्रजांनी स्वातंत्र्य द्यावयाचे ठरवले, याचा अर्थ हैद्राबादच्या निजाम उस्मान अलीला स्वातंत्र्य मिळणार होते. १५ आगस्ट १९४७ भारताला स्वातंत्र्य मिळाले तेंव्हा या स्वातंत्र्य प्राप्तीचा निखळ आनंद नांदेड परिसरातील लोकांना उपभोगता आला नाही. साऱ्या हैद्राबाद राज्यातच पोलिसांचा रझाकराचा ससेमिरा चुकवत तिरंगा फडकावण्याचे प्रयत्न झाले. तिरंगा फडकवणाऱ्या कार्यकर्त्याना राज्यद्रोही ठरवुन तुरुंगात डांबण्यात आले. विलिनीकरण दिन म्हणुन हा दिवस साजरा झाला.

१५ सप्टेंबर १९४७ पर्यंत राज्यभरात आंदोलनाने व्यापक स्वरुप धारण केले होते. हैद्राबाद राज्य पुरभिलेखागारातील उपलब्ध कागदपत्रातून १९४८ च्या ऑगस्ट-सप्टेबर महिन्यात हैद्राबाद राज्यातली परिस्थिती दिवसे न् दिवस तणावपुर्ण बनत गेली. रझाकाराचे अत्याचार वाढत गेले. १३ सप्टेंबर १९४८ या रोजी स्वतंत्र भारताच्या फौजा हैद्राबाद राज्यात शिरल्या आणि “आपरेशन पोलो” सुरु झाले. चार दिवसात हैद्राबादच्या सैन्याने शरणागती पत्कारली, हैद्राबाद सैन्याचा सेनापती अल् इद्रुसने शरणागती पत्कारली आणि हैद्राबादेत तिरंगा फडकला. नांदेडच्या अव्वल तालुकदार कार्यालयावरही तिरंगा फडकला. हळुहळु स्थित्यंतर घडु लागले. अव्वल तालुकदाराच्या जागी नांदेडलाही कलेक्टर आला. मध्ययुगीन निजामी सल्तनतीच्या कारभाराचे रुपांतर अधुनिक प्रजासत्ताकीय यंत्रणेत होऊ लागले. प्रत्येक जिल्ह्यासाठी नागरी प्रशासक, जिल्हा पोलीस प्रमुख नेमला गेला. लष्करी प्रशासनाचा काळ संपल्यानंतर नागरी प्रशासकाच्या जागी कलेक्टर नेमले गेले.

## २.६. राज्य पुनर्रचना आणि महाराष्ट्र राज्य निर्मिती:

१९२० साली अखिल भारतीय कॉंग्रेस ने घटनेच्या पहिल्या मसुद्यातच भाषावार प्रांत रचनेचा विचार समाविष्ट केला होता. १९५५ साली फाजल अली अहवाल सादर झाला. द्विभाषिक मुंबई राज्य अस्तित्वात आले. हैद्राबाद राज्याचे विभाजन झाले. मराठवाडा मुंबई राज्यात समाविष्ट झाला. नांदेड जिल्हा आता हैद्राबाद राज्यातून मुंबई राज्यात समाविष्ट झाला. १ मे १९६० रोजी मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र अस्तित्वात आला. मुंबई प्रांताचे विभाजन होऊन गुजरात आणि महाराष्ट्र ही दोन राज्ये निर्मीली गेली. आता नांदेड जिल्हा महाराष्ट्र राज्याचा भाग बनला. अत्यंत संथ गतीने वाटचाल करणारे मध्ययुगीन सल्तनतीतले नांदेड आता झपाट्याने बदलु लागले. नंदीतटांचे नांदेड आता लहान गावठाण राहीले नाही, शहर बनले, पाहता पाहता शहराचा विस्तार घडत गेला आणि १९९७ साली नांदेड- वाघाळा महानगरपालीका अस्तित्वात आली. संपुर्ण जिल्ह्यात मिळुन एक हायस्कुल असलेल्या नांदेडात स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ स्थापन झाले. अनेक महाविद्यालये निघाली. वैद्यकीय, अभियंत्रिकी, विधी, औषध निर्माण अशा विविध विद्याशाखांचे शिक्षण देणारी विविध महाविद्यालये अस्तित्वात आली. नांदेड जिल्ह्याने मध्ययुगीन मागसलेपणाची कात टाकुन २१ व्या शतकाकडे वाटचाल सुरु केली आहे.

## २.७. तालुके

१९५६ मध्ये राज्यांच्या पुनर्रचनेनंतर, मुंबई राज्यातल्या नांदेड जिल्ह्यात कंधार, हदगाव, बिलोली, देगलूर, मुधोळ या सहा तालुक्यांचा समावेश झाला, तर मुखेड आणि भोकरला महाल (महसूल मुख्यालय) म्हटलं गेलं. १९६९ च्या राज्यांच्या पुनर्रचनेत देगलूर तालुक्यातलं बिचकुंडा, जुक्कल ही गावं तसंच संपूर्ण मुधोळ तालुका (धर्माबाद वगळून) तेलंगणातल्या निजामाबाद जिल्ह्यात विलीन करण्यात आला. त्यांच्या बदल्यात किनवट व इस्लापूर ही गावं आदिलाबाद जिल्ह्यापासून वेगळी करून नांदेड जिल्ह्याचा भाग बनवण्यात आली. इस्लापूर हे गाव किनवट तालुक्याला जोडून धर्माबाद हे गाव बिलोली तालुक्यात घेण्यात आलं. नांदेड जिल्ह्याचं एकूण क्षेत्रफळ १०३३२ चौरस किमी आहे.

सध्या नांदेड जिल्ह्यात नांदेडसह पुढीलप्रमाणे १६ तालुके आहेत : माहूर, किनवट, हदगाव, हिमायतनगर, भोकर, अर्धापूर, धर्माबाद, उमरी, मुदखेड, बिलोली, नायगांव, देगलुर, मुखेड, कंधार, लोहा व नांदेड.

## २.८. भाषा

नांदेड जिल्ह्याची प्रमुख भाषा **मराठी भाषा** आहे. आदिवासी क्षेत्रात बोलीभाषा वापरली जाते. तसेच तेलंगाणा आणि कर्नाटक राज्याच्या सीमेलगत असल्यामुळे येथे काही नागरिक **तेलुगू**, **कन्नड** व **दख्खनी उर्दू** भाषेत सुद्धा बोलतात. गोरमाटी भाषा अनेक वस्ती, तांड्यावर बोलली जाते इथे गोर बंजारा समाज पण मोठ्या संख्येने उपस्थित असलेले आढळून येते.नांदेड येथे पंजाबी भाषा पण मोठ्या प्रमाणात बोलल्या जाते.

## २.९. परंपरा

दक्षिण भारतात प्रसिद्ध असलेली माळेगाव यात्रा , महाविहार बाबरी नगर दाभड येथे भरणारी महाधम्म परिषद, बारड चैत्र पौर्णिमा यात्रा, हुजुर साहिब नांदेड दसरा हल्लाबोल महल्ला, भगवान बालाजी दसरा रथयात्रा नांदेड, दाभड सत्य गणपती, कंधार येथील हजिसाया उरूस, माहूर येथील नारळी पौर्णिमा निमित्त भरणारी परिक्रमा यात्रा तसेच नवरात्र महोत्सव, दत्तशिखर माहूर येथील दत्त जयंती सोहळा, सोनखेड येथील जगदगुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या जयंती निमित्त साजरा होणारा बिजोत्सव सप्ताह, हिन्दू व शीख समुदायाचा दसरा हे वार्षिक सोहळे अत्यन्त छान असतात. रावण दहन, दीपावली, सन्दल, रमजान ईद, बकरी ईद, ईद ए मिलाद, शिवजयन्ती,डॉ. बाबासाहेब आम्बेडकर जयंती, अण्णा भाऊ साठे जयन्ती, बुद्ध पौर्णिमा, गणेश उत्सव हे दिवस उत्साहाने साजरे होतात.